REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# बीड जिल्ह्यातील तृतीयपंथी व्यक्तींना शिक्षण घेताना आलेल्या समस्यांचा अभ्यास

शंकर दशरथ दुनघव[१] , डॉ. एस.एस. गणपूर[२]
[१]संशोधक
[२]मार्गदर्शक

## प्रास्ताविक



प्राचीन काळापासून मानव उत्क्रांत होत आलेला आहे.अगदी जंगली अवस्थेपासून आजच्या ज्ञान,विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगापर्यंतमानवाने अनेक बदल पाहिलेले आहेत.किंबहूना त्या बदलाशी त्याने समायोजन साधले आहे. व्यक्तीच्या बौद्धिक,मानसिक,भावनिक आणि सामाजिक अशा विविध पैलूंचा विकास मनुष्याने शिक्षणाच्या माध्यमातून घडवून आणलेला आपणास दिसून येतो. म्हणूनच व्यक्तींच्या जीवनात शिक्षणाला अत्यंत महत्व आहे. शिक्षण हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे.

जगभरात शिक्षणाची प्रक्रिया गतिमान होत असताना तृतीयपंथी व्यक्तींच्याजीवनमानात मात्र शिक्षणाच्या माध्यमातून योग्य परिवर्तन साधले जात नाही. त्यांचा सामाजिक विकास घडून आलेला दिसून येत नाही ही चिंतेची बाब आहे.अशा परिस्थितीत संशोधकाने प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने बीड जिल्ह्याच्या मर्यादेत अभ्यास केलेला आहे.

## भारतातील विविध भाषेतील तृतीयपंथी व्यक्तींची नावे

**उर्दू व हिंदी :-**हिजडा,हिजर,उर्दूमध्ये ख्वाजासरा
**बंगाली भाषा :-**हिजला,हिजर,हिजरे
**गुजराती भाषा :-**पावैय्या
**पंजाबी :-**खुस्रा,जन्खा,खासुआ
**तेलगू भाषा :-**नापुंसकुडू,कोज्जा,मादा
**तामिळ भाषा :-**थिरुनानगाई,अरवन्नी,आली,अरूवनी
**मराठी भाषा :-**कोती,हिजडा,छक्का,बायल्या,तृतीयपंथी, ह्याबरोबरच भारतात सर्वत्र तृतीय प्रकृती, हिजडा,हिजडी,किन्नर,अर्धनारी,जोगप्पा,उभयलिंगी,जोगता,निर्वाण कोती अशा विविध नावांनी तृतीयपंथियांची ओळख आहे.
**इंग्रजी भाषा :-**इंग्रजी भाषेत तृतीयपंथियांसाठी'eunuch' हा शब्द वापरलेला अनेक ठिकाणी आढळतो.

## संशोधन शीर्षकः-

बीड जिल्ह्यातील तृतीयपंथी व्यक्तींना शिक्षण घेताना आलेल्या समस्यांचा अभ्यास

## शीर्षकातील पदांच्या कार्यात्मक व्याख्या :-

**बीड जिल्हा :-** प्रस्तुत पद हे संशोधनाचे भौगोलिक क्षेत्र निर्देशित करते. बीड जिल्हा म्हणजे महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागातील बीड नावाचा जिल्हा.

**तृतीयपंथी व्यक्ती :-**प्रस्तुत पद हे संशोधनातील जनसंख्या व न्यादर्शाचे निर्देशन करते.तृतीयपंथी व्यक्ती म्हणजे अशी व्यक्ती की,जी व्यक्ती आपल्या शारीरिक रचनेतील लिंगाला अनुसरुन वर्तन न करता मनोशारीरिक व लैंगिकदृष्ट्या विरुध्दलिंगी वर्तन करते. ह्या व्यक्ती कोती,निर्वाण कोती,डबल डेकर,हिजडा,हिजडी या नावाने सुध्दा ओळखल्या जातात. यातील काही व्यक्ती पुरुष वेशधारी तर काही स्त्रीवेशधारीअसतात.प्रस्तुत संशोधनाच्या अनुशंगाने तृतीयपंथी व्यक्ती म्हणजे न्यादर्शित तृतीयपंथी व्यक्ती शिक्षण घेताना आलेल्या समस्या - हे पद प्रस्तुत संशोधनाच्या आशयाचे व उद्दिष्टांचे निर्देशन करते. शिक्षण घेताना आलेल्या समस्या म्हणजे न्यादर्शित तृतीयपंथी व्यक्तींच्या शालेय शिक्षणाच्या आड आलेल्या व येत असलेल्या समस्या.

### ➢ संशोधनाचे उद्दिष्ट :-

१. बीड जिल्ह्यातील तृतीयपंथी व्यक्तींच्या शालेय शिक्षणाच्या आड येत असलेल्या समस्यांचा अभ्यास करणे.

### ➢ परिकल्पना :-

प्रस्तुत संशोधन हे शोधक संशोधन आहे ह्या संशोधन अभ्यासामध्ये कोणत्याही चलाचा परिणाम अभ्यासावयाचा नाही त्यामुळे संशोधन परिकल्पना किंवा शून्य परिकल्पना मांडलेली नाही.

### ➢ संशोधनाची गरज व महत्व :-

प्रस्तुत संशोधनाच्या मध्यमातून तृतीयपंथी समुहाच्या शिक्षणातील समस्यांचा अभ्यास करण्यात आलेला असल्याने सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या अनन्यसाधारण महत्व आहे.प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून शिक्षणात एक नवीन विचारप्रवाह निर्माण होऊ शकतो,तो शिक्षणास एक नवी दिशा देऊ शकतो.

### ➢ संशोधनाचीजनसंख्या :-

बीड जिल्ह्यातील ग्रामीण विकास मंडळ (अंबाजोगाई) ह्या सामाजिक संस्थेच्या (राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्थे अंतर्गत कार्य) नोंदणीनुसार प्रस्तुत संशोधनात नमुद केलेल्या तृतीयपंथी व्यक्तिंची संख्या ७५८ इतकी आहे.

### ➢ संशोधनाचा न्यादर्श :-

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अनुषंगाने जनसंख्येतील एकूण २० प्रतिसादकांच्या एका उद्दिष्टाच्या प्रतिसादांचा विचार करण्यात आलेला आहे.

### ➢ संशोधनाची पद्धती :-

प्रस्तुत संशोधनातून तृतीयपंथी व्यक्तिंच्या शिक्षणाच्या आड येत असलेल्या समस्यांचा शोध घ्यावयाचा असल्याने न्यादर्श सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

### ➢ संशोधनाची साधने :-

प्रस्तुत संशोधनासाठी न्यादर्शिततृतीयपंथी व्यक्तिंच्या शिक्षणातील समस्यांचा शोध घेण्यासाठी मुलाखत तंत्राचा अवलंब करण्यात आलेला आहे.

### ➢ माहितीचे अर्थनिर्वचन :-

बीड जिल्ह्यातील तृतीयपंथी व्यक्तिंच्या शालेय शिक्षणाच्या आड येत असलेल्या समस्यांचा शोध घेण्यासाठी विचारलेल्या प्रश्नांचे प्रतिसाद

LBP PUBLICATION

| अ.क्र | प्रतिसादकांना विचारलेले प्रश्न | प्रतिसाद | | एकूण प्रतिसादक संख्या व शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | |
| १ | शाळेत शिक्षकांची वागणूक योग्य वाटते का? | ८ | १२ | २० |
| | | ४० टक्के | ६० टक्के | १०० टक्के |
| २ | शाळेत वर्गमित्रांची वागणूक योग्य वाटते का? | ६ | १४ | २० |
| | | ३० टक्के | ७० टक्के | १०० टक्के |
| ३ | शाळेत शिक्षकांचे सहकार्य मिळते का? | ७ | १३ | २० |
| | | ३५ टक्के | ६५टक्के | १०० टक्के |
| ४ | गृहपाठ/वर्गपाठात वर्गमित्रांचे सहकार्य मिळते का? | ४ | १६ | २० |
| | | २० टक्के | ८० टक्के | १०० टक्के |
| ५ | शाळेत शिक्षकांचे प्रोत्साहन मिळते का? | ८ | १२ | २० |
| | | ४० टक्के | ६० टक्के | १०० टक्के |
| ६ | शाळेत वर्गमित्रांचे प्रोत्साहन मिळते का? | ५ | १५ | २० |
| | | २५ टक्के | ७५ टक्के | १०० टक्के |
| ७ | शालेय प्रशासनाचे प्रोत्साहन मिळते का? | ७ | १३ | २० |
| | | ३५ टक्के | ६५ टक्के | १०० टक्के |
| ८ | शाळेत भेदभावाची वागणूक मिळते का? | १७ | ३ | २० |
| | | ८५ टक्के | १५ टक्के | १०० टक्के |
| ९ | शाळेत शारीरिक त्रास होतो का? | १५ | ५ | २० |
| | | ७५ टक्के | २५ टक्के | १०० टक्के |
| १० | शाळेतील वातावरण आनंददायी वाटते का? | ५ | १५ | २० |
| | | २५ टक्के | ७५ टक्के | १०० टक्के |
| ११ | शाळेतील वातावरण सुरक्षित वाटते का? | ७ | १३ | २० |
| | | ३५टक्के | ६५ टक्के | १०० टक्के |
| १२ | शाळेतील सार्वजनीक बाबींचा उपभोग घेता येतो का? | ७ | १३ | २० |
| | | ३५ टक्के | ६५ टक्के | १०० टक्के |
| १३ | शालेय वातावरणात तुमच्याबद्दल तिरस्काराची भावना आहे असे वाटते का? | १६ | ४ | २० |
| | | ८० टक्के | २० टक्के | १०० टक्के |
| १४ | शिक्षणाचा खर्च व्यवस्थित भागतो का? | ३ | १७ | २० |
| | | १५ टक्के | ८५ टक्के | १०० टक्के |
| १५ | कुटुंबाकडून शिक्षणास प्रोत्साहन मिळते का? | ८ | १२ | २० |
| | | ४० टक्के | ६० टक्के | १०० टक्के |
| १६ | परिपाठ/खेळ/सांस्कृतिक उपक्रम इ.मध्ये सहभागाची समान संधी मिळते का? | ७ | १३ | २० |
| | | ३५ टक्के | ६५ टक्के | १०० टक्के |

## निष्कर्ष :-

१. बीड जिल्ह्यातील तृतीयपंथी व्यक्तींना शालेय शिक्षण घेताना शिक्षक,शालेय प्रशासन, वर्गमित्र व कुटुंब ह्या घटकांकडून शिक्षणासाठी सहकार्य,प्रोत्साहन मिळत नाही.

२. बीड जिल्ह्यातील तृतीयपंथी व्यक्तींना शालेय शिक्षण घेताना भेदभावाची वागणूक,तुच्छतेची वागणूक, शारीरिक त्रास अशा प्रकारच्या समस्या येतात.

३. बीड जिल्ह्यातील तृतीयपंथी व्यक्तींना सहशालेय उपक्रमात सहभागाची समान संधी मिळत नाही,शाळेतील सार्वजनिक बाबींच्या वापराबाबत भेदभाव केला जातो.

४. बीड जिल्ह्यातील तृतीयपंथी व्यक्तींना शालेय वातावरण आनंददायी वाटत नाही,सुरक्षित वाटत नाही.

५. बीड जिल्ह्यातील शाळेतील मानवी घटकांचा तृतीयपंथी व्यक्तींकडे बघण्याचा दृष्टीकोन तिरस्कारात्मक,नकारात्मक दिसून येतो.

## ➢ संदर्भ सूची:-


१. जॉर्ज पेन, (उद्धरण स्रोत): कुंडले म.बा. (जॉर्ज पेन) (१९७७) शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र (आवृत्ती ३ री) पुणे: श्री विद्या प्रकाशन पृ.क्र. ४१.

२. पंडित बन्सी बिहारी (१९८७) शिक्षणातील संशोधन (आवृत्ती: १ ली) पुणे: नूतन प्रकाशन पृ.क्र. ५९

३. पाउलो फ्रेअरी (उद्धरण स्रोत): गुरव के.एस. व इतर (१९९५ इ.स.), प्रौढ व निरंतर शिक्षण, (आवृत्ती १), नाशिक: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

४. बेस्ट जे. डब्ल्यु, केहन जे.व्ही (१९९५ इ.स.आ) पृ. १८५

५. मुळे उमाठे (१९९८) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे नागपूर महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.

६. लोंगेकर बापू (२४/०५/२०१३) समन्वयक (ग्रामीण विकास मंडळ, अंबेजोगाई) ह्यांची मुलाखत.

७. www.drpiyushsaxena.comen.wikipedia.org/education_for_all


LBP PUBLICATION